नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३३९ | Issue - 339 | वार शुक्रवार दि. १ मे २०२६ | Blow- Friday Date 1 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com


## राज्यातील १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल शनिवारी जाहीर होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल शनिवार २ मे रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाकडून जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर, विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजता ऑनलाईन वेबसाटईवर पाहता येणार आहे. काही दिवसांपूर्वी सीबीएसई बोर्डाचा निकाल जाहीर झाला होता. त्यानंतर, राज्यातील १२ बोर्ड परिक्षेच्या निकालाच्या तारखेकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल शनिवार, दिनांक २ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येणार आहे. सदर निकाल अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी आपला आसन क्रमांक व इतर आवश्यक तपशीलांच्या आधारे निकाल पाहता येईल. यासंदर्भात अधिक माहिती देण्यासाठी शनिवार, २ मे रोजी सकाळी ११ वाजता राज्य मंडळाच्या कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. बारावीचा निकाल शनिवारी जाहीर होणार असून सकाळी ११ वाजता बोर्डाची पत्रकार परिषद होणार आहे. त्यामध्ये, राज्याचा निकाल, कोणत्या विभागात किती निकाला आणि एकूण विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने निकाला जाहीर होईल. त्यानंतर, दुपारी १ वाजता विद्यार्थ्यांना ऑनलाइन निकाल पाहता येणार आहे. ारहरींी-ललेरीव.ळप या संकेतस्थळावर हा निकाल पाहता येणार आहे.

सीबीएससी बोर्डाच्या शाळांत तीन भाषा - यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता सहावीपासून सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये तीन भाषा विद्यार्थ्यांना शिकाव्या लागतील तर परदेशातून भारतीय शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन भाषांच्या अटीतून सूट असेल त्यासोबतच मंडळाने पुढील वर्षीपासून गणित आणि विज्ञानासाठी नेहमीच्या ऐंशी गुणांच्या परीक्षा व्यतिरिक्त आणखी एक पर्याय दिला आहे. ही परीक्षा २५ गुणांची असून त्यात संबंधित विषयाची आकलन क्षमता कसोशीने तपासली जाणार आहे. यातील गुण एकूण गुन्ह्यांमध्ये समाविष्ट न करता त्याची गुणपत्रिकेवर वेगळी नोंद करण्यात येईल, अशी देखील माहिती आहे.




## पर्यटकांनी भरलेली क्रूझ बुडाली; सहा जणांचा मृत्यू; अनेक जण बेपत्ता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भोपाळ: मध्य प्रदेशच्या जबलपूरमधील प्रसिद्ध पर्यटन स्थळावर मोठी दुर्घटना घडली आहे. नर्मदा नदीच्या बॅकवॉटरमध्ये पर्यटकांनी भरलेली क्रूझ अचानक बुडाली. दुर्घटनेवेळी क्रूझमध्ये जवळपास ३० प्रवासी होते.

जबलपूरमधील प्रमुख पर्यटन स्थळ असलेल्या बरगी धरण परिसरात क्रूझला अपघात झाला. क्रूझ नर्मदा नदीच्या बॅकवॉटरमध्ये असताना वातावरण अचानक बिघडलं. सोसाट्याचा वारा सुटला. क्रूझ खोल भागात असताना लाटा उसळू लागल्या. वाऱ्याचा वेग प्रचंड असल्यानं दबाव निर्माण झाला. त्यामुळे क्रूझचं संतुलन बिघडलं. अवघ्या काही मिनिटांत क्रूझ पाण्यात बुडालं.

अपघात झाल्यानंतर स्थानिक नावाडी आणि प्रशासनानं तातडीनं बचाव कार्य सुरु केलं. आतापर्यंत १५ जणांची सुरक्षित



सुटका करण्यात आली आहे. त्यांना पाण्याबाहेर काढण्यात यश आलं आहे. मदत आणि बचाव पथकांनी आतापर्यंत ४ शव पाण्याबाहेर काढले आहेत. अजूनही बरेच जण बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरु आहे. यासाठी पाणबुडे आणि एसडीआरएफच्या पथकांना पाचारण करण्यात आलं आहे.

दुर्घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि जिल्हा प्रशासनाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी बॅकवॉटर परिसरात पोहोचले. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, अचानक आलेल्या वादळामुळे क्रझ चालकाला दुर्घटना टाळण्याची संधीच मिळाली नाही. क्रूझचं संतुलन बिघडल्यानं हा अपघात झाला.

जबलपूरचे जिल्हाधिकारी राघवेंद्र सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, दुर्घटनेवेळी क्रूझमध्ये ३१ जण होते. पैकी चौघांचा मृत्यू झाला आहे. त्यांचे शव हाती लागले आहेत. १५ जणांना वाचवण्यात यश आलं असून १२ जणांचा शोध सुरु आहे. संध्याकाळच्या वेळी सोसाट्याचा वारा सुटल्यानं क्रूझला जलसमाधि मिळाली. ही क्रूझ मध्य प्रदेश पर्यटन मंडळ म्हणजेच एमपीटीकडून चालवली जात होती.

राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते दिग्विजय सिंह यांनी जबलपूरमधील बरगी धरण परिसरात घडलेल्या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. 'क्रूझ बुडाल्याची घटना दुर्दैवी आहे. या दुर्घटनेत अनेक जण दगावल्याची माहिती पुढे आली आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो,' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

## विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महाराष्ट्रात विधान परिषद निवडणुकीचे वारे जोरदार रंगात असताना मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्रात होत असलेली विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे जवळपास आता निश्चित झाले आहे. भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. विधान परिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. १२ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल. तर १२ मे रोजीच निकाल जाहीर होणार आहे.

मविआचं सूत्र जुळलं , काँग्रेसचा अंबादास दानवेंना पाठिंबा

उद्धव ठाकरेंनी अंबादास दानवेंना उमेदवारी दिल्यामुळे काँग्रेसकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. काँग्रेसने उमेदवार देण्याबाबत चर्चा सुरू केली होती. पण ठाकरेंच्या शिष्टमंडळाने काँग्रेस नेत्यांची भेट घेत समजूत काढली. अखेर काँग्रेसकडून विधान परिषद निवडणूक न लढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे आणि ठाकरेसेनेचे अनिल देसाई यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यामध्ये हर्षवर्धन सपकाळ यांनी ठाकरेंनी दिलेल्या उमेदवाराला पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

विधान परिषदेच्या १० जागांसाठीची निवडणूक बिनविरोध होणार असल्याचं निश्चित झालं आहे. कुठल्याही पक्षाने अकरावा उमेदवार न दिल्याने विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होणार आहे. तीन अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केला असला तरी त्यांना १० आमदारांची सूचक म्हणून सही नसल्याने या संबंधित अपक्ष उमेदवारांचे अर्ज बाद ठरवले जातील. भाजपकडून ६, शिवसेनेकडून २, राष्ट्रवादी काँग्रेसकडून १ आणि मविआकडून १ उमेदवारांचा अर्ज दाखल झाला आहे.

(पान २ वर....)

## बच्चू कडू यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महाराष्ट्राच्या राजकारणात विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक आणि आक्रमक नेते बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत विलीन करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती समोर आली होती. मात्र आज बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं की, मी शेतकरी, मजूर, दिव्यांगासाठी धनुष्यबाण हाती घेणार आहे. काल परवा ज्या चर्चा झाल्या, त्या सर्व शिवसेनेनं मान्य केल्या आहेत.बच्चू कडूचं काम प्रामाणिकपणे राहिल, असा विश्वासही त्यांनी यावेळी दिला आहे. तर प्रहार संघटना आहे तशीच राहणार आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

पेरणी ते कापणीपर्यंत सगळे काम मनरेगा मध्ये घ्यावं, हमीभावामध्ये ज्या सुधारणा हव्या आहेत, त्यांच्यासाठी लढण्याची गरज आहे. लाडक्या बहिणीमधील विधवा बहिणी तशाच आहेत. दिव्यांगांच मंत्रालय शिंदेंनी साहेबांनी स्थापित केलं त्याचं बळकटीकरण झालं नाही,

हे सगळे मुद्दे मान्य झाल्यानंतर हा निर्णय घेतो आहे, बच्चू कडूचं काम प्रामणिक राहिलं, शिवसेनेची राजकीय ताकद मजबुत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू, त्याच्या बदल्यात शेतकऱ्यांची ताकद, दिव्यांगांची ताकद, मला हवी आहे, त्याच्या बदल्यात कोणताही समझोता होणार नाही, एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वामध्ये दिव्यांग मंत्रालय जर उभं राहत असेल तर त्याच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न झाला पाहिजे.

## महाराष्ट्राला मोठा दिलासा; तापमानात घट, काही जिल्ह्यांत पावसाची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : राज्यभरात काही दिवसांपासून तापमानाचा पारा वाढला होता. मात्र तीव्र उकाड्यानंतर आता हवामानात काहीसा बदल जाणवू लागला असून, गेल्या दोन दिवसांत तापमनात घट नोंदवली गेली आहे. त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून थोडासा दिलासा मिळाला आहे, अशी माहिती पुणे हवामान विभागातील शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिली आहे.

मागील काही दिवसांत राज्यातील अनेक भागांमध्ये तापमानाने ४६ अंश सेल्सिअसचा उच्चांक गाठला होता. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांत उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणावर वाढली होती. मात्र, सध्या परिस्थिती काहीशी स्थिर होताना दिसत असून तापमानात घट झाल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे.

एस डी सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, विदर्भात गेल्या दोन दिवसांत तापमान सुमारे २ अंश सेल्सिअसने कमी झाले आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातही अशीच स्थिती पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी आजही तापमानात घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पुण्यातही मागील काही दिवसांच्या तुलनेत तापमानात थोडीशी घट जाणवली आहे. मात्र, येत्या काही दिवसांत पुण्यात तापमान ३८ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे उकाडा पूर्णपणे कमी झाला नसला तरी तीव्रतेत काहीशी घट झाल्याचे चित्र आहे. दरम्यान, विदर्भासाठी एक दिलासादायक अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. २ तारखेपासून विदर्भात पावसाची शक्यता असल्याचे सानप यांनी सांगितले. यामुळे त्या भागातील तापमान आणखी कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पुढील ५ ते ७ दिवस विदर्भात तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत राहू शकते, तर मराठवाड्यात ३८ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान तापमान राहण्याचा अंदाज आहे. राज्यातील अनेक भागांत पुढील काही दिवस तापमान सुमारे ३८ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता आहे. एकूणच, उकाड्याची तीव्रता काही प्रमाणात कमी झाली असली तरी पूर्णतः दिलासा मिळण्यासाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. काही भागात पावसाची शक्यता असल्यामुळे शेतकऱ्यांनी पिकाची आणि नागरिकांनी देखील स्वतःची काळजी घेण्याचे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

**काही सेकंदांत दोन मिसाईली डागल्या, गरज पडल्यास दिशा सुद्धा बदलणार**

## हेलिकॉप्टरमधून प्रथमच नौदल जहाजविरोधी मिसाईल यशस्वी प्रक्षेपित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : डीआरडीओ आणि नौदलाने बंगालच्या उपसागरात हेलिकॉप्टरमधून कमी पल्ल्याचे नौदल जहाजविरोधी क्षेपणास्त्र यशस्वीरित्या प्रक्षेपित केले. हेलिकॉप्टरमधून काही सेकंदांच्या अंतराने दोन क्षेपणास्त्रे डागण्यात आली, ज्यांनी अचूकपणे जहाजाच्या खालच्या भागावर मारा केला. याद्वारे भारताने आपल्या साल्वो लाँच क्षमतेची चाचणी घेतली. म्हणजेच, कमी कालावधीत एकाच लाँचरमधून अनेक क्षेपणास्त्रे डागण्याची क्षमता. हे तंत्रज्ञान शत्रूच्या रडार प्रणालींना चकमा देऊ शकते. ओडिशातील चंदीपूर चाचणी केंद्रावर स्थापित रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल प्रणाली आणि टेलिमेट्रीच्या साहाय्याने क्षेपणास्त्राच्या संपूर्ण उड्डाणाचा आणि लक्ष्याचा मागोवा घेण्यात आला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले की, या क्षेपणास्त्राच्या विकासामुळे लष्कराच्या क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ होईल.

जहाजावर अत्यंत विध्वंसक हल्ला

क्षेपणास्त्राने जहाजाच्या त्या भागाला लक्ष्य केले, जो आदळल्यास नुकसानीसाठी सर्वात असुरक्षित होता. हे क्षेपणास्त्र बूस्टर लाँच प्रणाली आणि स्वतंत्र उड्डाण टिकवून ठेवणाऱ्या प्रणालीने सुसज्ज आहे. याव्यतिरिक्त, लक्ष्य ओळखणे, मार्ग निश्चित करणे आणि उंची कायम राखण्यासाठी अनेक तंत्रज्ञान एकत्रित करण्यात आले आहेत. या क्षेपणास्त्रामध्ये एक अशी प्रणाली आहे, जी त्याला उड्डाणादरम्यान नवीन



माहिती प्राप्त करण्यास अनुमती देते. गरज पडल्यास ते दिशाही बदलू शकते. हे क्षेपणास्त्र डीआरडीओच्या विविध प्रयोगशाळा आणि भारतीय उद्योगांनी संयुक्तपणे विकसित केले आहे. आता त्याचे उत्पादन देशांतर्गत केले जात आहे.

युद्धनौका प्रकल्पाच्या चाचण्याही पूर्ण

शनिवारी, डीआरडीओ आणि नौदलाने एका नवीन युद्धनौका प्रकल्पासाठी हायड्रोडायनॅमिक कामगिरी आणि मॉडेल चाचणी पूर्ण केली. हे काम नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळा (छडढङ) आणि नौदलाच्या युद्धनौका डिझाइन ब्युरोने संयुक्तपणे केले. या चाचण्यांमध्ये जहाजाचा वेग, पाण्यातील वर्तन, इंजिनची शक्ती आणि वळण्याची क्षमता यांसारख्या महत्त्वाच्या बाबींचे मूल्यांकन करण्यात आले. याचे निकाल आंतरराष्ट्रीय मानकांनुसार असल्याचे आढळले.

नवीन चिलखती प्लॅटफॉर्मचे अनावरण

डीआरडीओचे अध्यक्ष समीर व्ही. कामत यांनी प्रकल्पाचे निकाल नौदल अधिकारी संजय साधू यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी डीआरडीओ आणि नौदलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथे डीआरडीओने नवीन चिलखती प्लॅटफॉर्मचे अनावरण केले. हे ट्रॅक असलेले आणि चाके असलेले दोन्ही प्रकारचे आहेत. लष्कराच्या गरजा लक्षात घेऊन त्यांची रचना करण्यात आली आहे. हे प्लॅटफॉर्म ३० मिमी क्रूलेस टरेटने सुसज्ज आहेत. ते शक्तिशाली इंजिन आणि ऑटोमॅटिक ट्रान्समिशनने सुसज्ज आहेत, ज्यामुळे त्यांचा वेग आणि क्षमता वाढते. तसेच, त्यांना सर्व बाजूंनी संरक्षक कवचही आहे.

हे प्लॅटफॉर्म जमिनीवर तसेच पाण्यातही कार्यरत राहू शकतात. ते हायड्रो जेट तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत, ज्यामुळे त्यांना पाण्यात चालवणे सोपे होते. ते रणगाडाविरोधी मार्गदर्शित क्षेपणास्त्रे डागण्यासही सक्षम आहेत. सध्या या प्लॅटफॉर्ममध्ये अंदाजे ६५ टक्के स्वदेशी सामग्रीचा वापर केला जातो आणि हे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची योजना आहे.

### शनिवारी अंक नाही

आज शुक्रवार, १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त दैनिक यश सिद्धी न्यूज कार्यालयास सुटी असल्या कारणाने उद्या शनिवार, २ मे २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

## संपादकीय....

# यशस्वी कामगिरी

डीआरडीओ आणि नौदलाने बंगालच्या उपसागरात हेलिकॉप्टरमधून कमी पल्ल्याचे नौदल जहाजविरोधी क्षेपणास्त्र यशस्वीरित्या प्रक्षेपित केले. हेलिकॉप्टरमधून काही सेकंदांच्या अंतराने दोन क्षेपणास्त्रे डागण्यात आली, ज्यांनी अचूकपणे जहाजाच्या खालच्या भागावर मारा केला. याद्वारे भारताने आपल्या साल्वो लॉंच क्षमतेची चाचणी घेतली. म्हणजेच, कमी कालावधीत एकाच लॉंचरमधून अनेक क्षेपणास्त्रे डागण्याची क्षमता. हे तंत्रज्ञान शत्रूच्या रडार प्रणालींना चकमा देऊ शकते. ओडिशातील चंदीपूर चाचणी केंद्रावर स्थापित रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल प्रणाली आणि टेलिमेट्रीच्या साहाय्याने क्षेपणास्त्राच्या संपूर्ण उड्डाणाचा आणि लक्ष्याचा मागोवा घेण्यात आला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले की, या क्षेपणास्त्राच्या विकासामुळे लष्कराच्या क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ होईल. क्षेपणास्त्राने जहाजाच्या त्या भागाला लक्ष्य केले, जो आदळल्यास नुकसानीसाठी सर्वात असुरक्षित होता. हे क्षेपणास्त्र बूस्टर लॉंच प्रणाली आणि स्वतंत्र उड्डाण टिकवून ठेवणाऱ्या प्रणालीने सुसज्ज आहे. याव्यतिरिक्त, लक्ष्य ओळखणे, मार्ग निश्चित करणे आणि उंची कायम राखण्यासाठी अनेक तंत्रज्ञान एकत्रित करण्यात आले आहेत. या क्षेपणास्त्रामध्ये एक अशी प्रणाली आहे, जी त्याला उड्डाणादरम्यान नवीन माहिती प्राप्त करण्यास अनुमती देते. गरज पडल्यास ते दिशाही बदलू शकते.

# कामगार दिन : श्रमाच्या घामाला न्याय कधी मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवी संस्कृतीचा इतिहास जर नीट वाचला तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसते, या जगातील प्रत्येक उंच इमारतीच्या पायात कामगाराचा घाम मिसळलेला आहे. प्रत्येक कारखान्याच्या भिंतींवर श्रमिकांच्या हातांचे ठसे आहेत. प्रत्येक रस्त्याच्या डांबरीकरणात, प्रत्येक धरणाच्या उभारणीत, प्रत्येक रेल्वे मार्गाच्या लोखंडात आणि प्रत्येक शहराच्या विस्तारात कामगारांचे आयुष्य झिजलेले आहे. जगाला गती देणारा खरा चाक जर कोणाचा असेल, तर तो कामगाराचा आहे. म्हणूनच १ मे हा दिवस 'जागतिक कामगार दिन' म्हणून साजरा केला जातो. पण प्रश्न असा आहे की, हा दिवस केवळ शुभेच्छांचा आणि भाषणांचा राहिला आहे का? श्रमाचा सन्मान खऱ्या अर्थाने समाजाच्या आचरणात उतरला आहे का? कामगार दिनाची प्रेरणा अमेरिकेतील शिकागो येथे १८८६ साली झालेल्या ऐतिहासिक श्रमिक आंदोलनातून मिळाली. आठ तास काम, आठ तास विश्रांती आणि आठ तास वैयक्तिक जीवन, या मागणीसाठी हजारो कामगार रस्त्यावर उतरले. त्या संघर्षात अनेकांनी प्राण दिले. त्यांच्या बलिदानातून श्रमिक हक्कांची नवी पहाट उगवली. आज जगभर कामगार दिन साजरा होत असला, तरी त्या दिवसामागील रक्त, अश्रू आणि संघर्षाची कहाणी विसरून चालणार नाही.

भारतातील कामगार चळवळीचाही इतिहास तितकाच तेजस्वी आहे. गिरणगावातील कामगारांचे संघर्ष, रेल्वे कर्मचाऱ्यांची आंदोलने, शेतमजुरांच्या लढाया, बांधकाम मजुरांचे मोर्चे या साऱ्यांनी भारतीय लोकशाहीला सामाजिक न्यायाची धार दिली. आपल्या संविधानाने कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्याचे आश्वासन दिले. किमान वेतन, कामाचे तास, सुरक्षितता, संघटन स्वातंत्र्य, प्रसूती लाभ, निवृत्ती वेतन यांसारख्या अनेक संकल्पना श्रमिक चळवळीमुळे शक्य झाल्या. मात्र, आजच्या वास्तवाकडे पाहिले, तर प्रश्न अधिक गंभीर वाटतो. अर्थव्यवस्था वाढते आहे, उद्योग वाढत आहेत, शहरांचे विस्तार होत आहेत; पण कामगाराचे जीवन कितपत बदलले? अनेक ठिकाणी कंत्राटी पद्धतीच्या नावाखाली असुरक्षित रोजगार वाढला आहे. दिवसाला दहा-दहा तास काम करूनही पोट भरत नाही, अशी लाखो कुटुंबांची अवस्था आहे. कारखान्यातील कामगार असो, बांधकाम मजूर असो, सफाई कर्मचारी असो, शेतमजूर असो किंवा घरकाम करणाऱ्या महिला असोत, त्यांच्या श्रमाचे मोल अजूनही समाजाने पूर्ण मान्य केलेले नाही.




आजच्या डिजिटल युगात कामगारांचे रूप बदलले आहे. ॲपवर काम करणारे डिलिव्हरी बॉय, कॅब चालक, वेअरहाऊस कर्मचारी, कुरिअर सेवा देणारे युवक, डेटा एंट्री करणारे तरुण, कॉल सेंटर कर्मचारी हे सारे आधुनिक अर्थव्यवस्थेचे नवे कामगार आहेत. त्यांच्याकडे निश्चित कामाचे तास नाहीत, सामाजिक सुरक्षा नाही, उद्याची खात्री नाही. स्क्रीनवर दिसणाऱ्या सुविधांच्या मागे अनेक अदृश्य श्रमिकांचे कष्ट आहेत. आपण एका क्लिकवर जेवण मागवतो; पण ते वेळेत पोहोचवण्यासाठी उन्हात, पावसात, धुळीत धावणाऱ्या युवकाच्या आयुष्याचा विचार कितीदा करतो? कोरोना महामारीने जगाला एक गोष्ट शिकवली, कामगारांशिवाय समाज थांबतो. लॉकडाऊनच्या काळात हजारो स्थलांतरित कामगार पायी निघालेले दृश्य भारताने पाहिले. शहरांचे वैभव उभारणारे हातच शहरांत परके झाले होते. रस्त्यावर चालणाऱ्या त्या पायांमध्ये केवळ वेदना नव्हती, तर व्यवस्थेच्या असंवेदनशीलतेचा आक्रोश होता. त्या प्रसंगाने विकासाच्या मॉडेलवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले. श्रमाला सन्मान देणे म्हणजे फक्त पगार देणे नव्हे. श्रमिकाला सुरक्षितता, आरोग्य, निवारा, शिक्षण, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानवी सन्मान देणे आवश्यक आहे. आजही अनेक कामगार झोपडपट्ट्यांत राहतात, मुलांचे शिक्षण अर्धवट राहते, आजारपणात उपचार मिळत नाहीत. रोजंदारी बंद झाली की घरातील चूल विझते. अशा परिस्थितीत 'विकास' हा शब्द अपुरा वाटतो. विकास तेव्हाच खरा, जेव्हा समाजातील सर्वांत कष्टकरी व्यक्तीच्या जीवनात प्रकाश पोहोचतो.

महिलांच्या श्रमाचा प्रश्न तर अधिकच वेदनादायी आहे. घरकाम, शेतकाम, कारखान्यातील काम, बांधकाम मजुरी, सेवा क्षेत्रातील योगदान, स्त्रिया सर्वत्र आहेत; पण त्यांचा श्रम अनेकदा अदृश्य ठरतो. घरकामाला अजूनही 'काम' मानले जात नाही. समान कामासाठी समान वेतनाचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, सन्मान आणि संधी या बाबतीत अजूनही मोठी दरी आहे. कामगार दिनी महिलांच्या श्रमाला न्याय देण्याचा संकल्प आवश्यक आहे. ग्रामीण भारतातील शेतमजूर आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांची अवस्था वेगळी नाही. दुष्काळ, कर्जबाजारीपणा, हंगामी रोजगार, कमी मजुरी, सामाजिक असुरक्षितता या प्रश्नांनी ते ग्रासलेले आहेत. शहरातील चमक आणि गावातील संघर्ष यामधील दरी अजूनही भरून निघालेली नाही. कामगार प्रश्न केवळ कारखान्यांपुरता मर्यादित नाही; तो शेतापासून शहरापर्यंत आणि बांधकामापासून आयटीपर्यंत विस्तारलेला आहे. कामगार दिन आपल्याला केवळ हक्कांची नव्हे, तर कर्तव्यांचीही आठवण करून देतो. उद्योगांनी कामगाराला खर्च समजू नये; तो उत्पादनाचा भागीदार आहे. सरकारने श्रमकायद्यांना कागदावर न ठेवता काटेकोर अंमलबजावणी करावी. समाजाने काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे सन्मानाने पाहावे. मुलांनी डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी होण्याची स्वप्ने पाहावीतच; पण श्रमाला कमीपणा समजण्याची मानसिकता मोडली पाहिजे.

आज शिक्षणातही 'डिग्निटी ऑफ लेबर'चा संस्कार हवा. स्वतःचे काम स्वतः करणे, श्रमाचा आदर करणे, स्वच्छता कर्मचाऱ्यापासून शेतकऱ्यापर्यंत प्रत्येकाला सन्मान देणे ही मूल्ये बालपणापासून रुजली पाहिजेत. समाजातील वर्गभेद आणि कामाविषयीचे अहंमन्य दृष्टिकोन मोडल्याशिवाय खरी समता येणार नाही. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे रोजगाराचे स्वरूप बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, रोबोटिक्स यामुळे अनेक पारंपरिक नोकऱ्या धोक्यात येत आहेत. अशा काळात कौशल्यविकास, पुनर्प्रशिक्षण आणि सामाजिक सुरक्षा या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. अन्यथा विकासाच्या नावाखाली मोठा वर्ग बेरोजगारीच्या गर्तेत ढकलला जाईल. कामगार दिन हा भविष्यातील रोजगारव्यवस्थेवर गंभीर विचार करण्याचाही दिवस आहे.

आज राजकीय मंचांवर कामगारांचे नाव घेतले जाते; पण निर्णय प्रक्रियेत त्यांचा आवाज किती ऐकला जातो? निवडणुकांत घोषणांची रेलचेल असते; पण श्रमिक वसाहतींच्या प्रश्नांवर किती काम होते? शहरातील उड्डाणपूल दिसतात, पण त्याखाली राहणाऱ्या मजुरांची झोपडी दिसत नाही. अर्थसंकल्पात आकडे दिसतात, पण रोजंदारी कामगाराच्या घरातील रिकामी ताटली दिसत नाही. ही दरी भरून काढावी लागेल. जागतिक कामगार दिन म्हणजे केवळ लाल झेंडे, मिरवणुका आणि भाषणे नव्हे. तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या घरातील मदतनिसाशी कसे वागतो? कार्यालयातील कनिष्ठ कर्मचाऱ्याचा आदर करतो का? रस्ते झाडणाऱ्या कर्मचाऱ्याकडे आपण कृतज्ञतेने पाहतो का? बांधकाम मजुराच्या मुलांच्या शिक्षणाबद्दल समाज म्हणून विचार करतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरेच कामगार दिनाचे खरे औचित्य ठरवतील.



कामगार हा दया मागणारा वर्ग नाही; तो न्याय मागणारा वर्ग आहे. त्याला सहानुभूती नव्हे, समान संधी हव्यात. त्याला टाळ्या नव्हे, हक्क हवेत. त्याला आश्वासने नव्हे, सुरक्षित भविष्य हवे आहे. श्रमाशिवाय संपत्ती निर्माण होत नाही, उत्पादन होत नाही, सेवा चालत नाही आणि राष्ट्र उभे राहत नाही. म्हणून श्रमिकांचा सन्मान हा उपकार नाही; तो समाजाचा नैतिक कर्तव्य आहे. १ मेच्या निमित्ताने आपण हा संकल्प करूया, श्रमाला प्रतिष्ठा देऊ, कामगाराला न्याय देऊ, कष्टकऱ्याच्या मुलांना शिक्षण देऊ, महिलांच्या श्रमाला मान्यता देऊ, असंघटित क्षेत्राला सुरक्षा देऊ आणि विकासाच्या केंद्रस्थानी माणसाला ठेवू. कारण शेवटी राष्ट्राची खरी ताकद शेअर बाजारात नसते, ती कारखान्यातील मशीनजवळ उभ्या कामगाराच्या हातात असते; ती शेतात वाकलेल्या मजुराच्या कण्यात असते; ती शहर घडवणाऱ्या बांधकाम कामगाराच्या घामात असते. जागतिक कामगार दिनानिमित्त सर्व श्रमिकांना मनःपूर्वक अभिवादन! त्यांच्या श्रमाचा सन्मान, त्यांच्या हक्कांचा विजय आणि त्यांच्या जीवनात मानसन्मानाचा प्रकाश नांदो, हीच खरी शुभेच्छा!

**– प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी :**
९९२३६२०९१९

# विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध ?

**(पान १ वरून..)**

**भाजपकडून विधान परिषदेसाठी कुणाला संधी**

प्रमोद जठार सुनील कर्जतकर माधवी नाईक संजय भेंडे विवेक कोल्हे प्रज्ञा सातव

शिवसेना ठाकरे गटाकडून विधान परिषदेसाठी कुणाला संधी

महाविकास आघाडी- अंबादास दानवे (उद्धव बाळासाहेब ठाकरे)

शिवसेना शिंदे गटाकडून विधान परिषदेसाठी कुणाला संधी

बच्चू कडू नीलम गोऱ्हे

राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून विधान परिषदेसाठी कुणाला संधी

झिशान सिद्दीकी

विधान परिषदेतील या ९ आमदारांचा कार्यकाळ संपणार

उद्धव ठाकरे (शिवसेना - उबाठा) नीलम गोऱ्हे (शिवसेना) अमोल मिटकरी (राष्ट्रवादी - अजित पवार गट) शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी - शरद पवार गट) गोपीचंद पडळकर (भाजप) रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप) राजेश राठोड (कॉंग्रेस) रमेश कराड (भाजप) प्रवीण दटके (भाजप)

# आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात स्वयंसेवी संस्थाद्वारा चालविल्या जाणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १२ व २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतरची दोन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे आदिवासी विभागाच्या ५५६ अनुदानित आश्रमशाळांतील ७ हजार ५६२ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या आदिवासी जनतेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी क्षेत्र विकासाचा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला आहे. या कार्यक्रमातंर्गत आदिवासी क्षेत्राचा शैक्षणिक विकास होण्यासाठी आश्रम शाळा महत्त्वाचा केंद्र बिंदू आहे. त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण ५५६ अनुदानित आश्रम शाळा चालविण्यात येत असून शाळांकरीता एकूण ७२४३ शिक्षक व ७५६२ शिक्षकेतर कर्मचारी पदे मंजूर आहेत. सध्या या अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी लागू असलेली सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची शिक्षकेतर कर्मचारी संघटनाची मागणी होती. यात शालेय शिक्षण विभागाने १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांतील शिक्षकेतर कर्मचा-यांना१२ व २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतरची २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना एक जानेवारी २०२४ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या अनुदानित आश्रमशाळा या शालेय शिक्षण विभागाच्या खाजगी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांच्या धर्तीवर चालविण्यात येतात व त्याबाबतचे सर्व नियम आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्थांद्वारा संचलित अनुदानित आश्रम शाळांना लागू केले जातात. त्यानुषंगाने शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्थेद्वारा संचलित अनुदानित आश्रमशाळांना प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांतील शिक्षकेतर कर्मचा-यांना १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतरची २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना १ जानेवारी २०२४ पासून लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

# भगवान बुद्ध : करुणा, प्रज्ञा आणि समतेचा शाश्वत मार्ग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय संस्कृतीच्या विशाल परंपरेत अनेक महामानवांनी मानवतेला दिशा दिली; परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे विचार काळाच्या सीमाही ओलांडतात. भगवान गौतम बुद्ध हे असेच विश्वमानव होते. त्यांनी केवळ एका धर्माची स्थापना केली नाही, तर माणसाला माणूस म्हणून जगण्याचा नवा मार्ग दिला. बुद्ध जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नाही; तो करुणा, विवेक, समता आणि शांततेच्या मूल्यांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. आज जग हिंसा, असहिष्णुता, विषमता आणि मानसिक अस्थिरतेच्या छायेत उभे असताना बुद्धांचे विचार अधिकच तेजस्वी वाटतात. सहाव्या शतकात कपिलवस्तूच्या राजघराण्यात सिद्धार्थ गौतमांचा जन्म झाला. वैभव, सत्ता आणि सुखसोयींच्या वातावरणात वाढलेला हा राजकुमार एका दिवशी वृद्धापकाळ, आजार, मृत्यू आणि संन्यासी या चार दृश्यांनी अंतर्मुख झाला. जीवन म्हणजे केवळ ऐश्वर्य नव्हे, तर दुःख, संघर्ष आणि अनिश्चिततेची श्रृंखला आहे, याची त्यांना जाणीव झाली. या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवाडा, सत्ता आणि सांसारिक मोह सोडला. ही घटना केवळ एका व्यक्तीचा त्याग नव्हती; ती मानवी इतिहासातील सत्यशोधाची क्रांतिकारी सुरुवात होती.

दीर्घ तपश्चर्या, चिंतन आणि आत्मसंवादानंतर बोधगया येथे पिंपळवृक्षाखाली सिद्धार्थांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' झाले, जागृत झालेले. त्यांनी जगाला सांगितले की दुःख आहे, दुःखाचे कारण आहे, दुःखाचा निरोध शक्य आहे आणि त्यासाठी मार्गही आहे. ही चार आर्यसत्ये मानवी जीवनाचे वास्तववादी विश्लेषण आहेत. बुद्धांनी दुःख नाकारले नाही, तर त्यावर उपाय सुचवला. म्हणूनच त्यांचे तत्त्वज्ञान निराशेचे नव्हे, तर आशेचे आहे. बुद्धांनी सांगितलेला अष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यक दृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयास, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी. हा मार्ग केवळ धार्मिक साधनेसाठी नाही, तर संतुलित आणि नैतिक जीवनासाठी आहे. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जगात हा मार्ग अधिकच महत्त्वाचा ठरतो. माणूस बाहेरून प्रगत झाला आहे; पण आतून अस्थिर झाला आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान मनाला स्थैर्य देणारे आहे.




भगवान बुद्धांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी समतेचा ध्वज उंचावला. त्या काळातील वर्णव्यवस्था, कर्मकांड, जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व आणि सामाजिक विषमता यांना त्यांनी थेट आव्हान दिले. त्यांनी स्पष्ट सांगितले, माणूस जन्माने मोठा होत नाही; तो कर्माने मोठा होतो. त्यांच्या संघात सर्व जातींचे, सर्व स्तरांतील लोकांना समान प्रवेश होता. स्त्रियांनाही त्यांनी भिक्षुणी संघात स्थान दिले. हे त्या काळातील सामाजिक क्रांतीचे अद्वितीय उदाहरण होते. आज आपण संविधान, लोकशाही आणि समानतेबद्दल बोलतो; पण या मूल्यांची बीजे बुद्धांच्या विचारांत दिसतात. त्यांनी कोणालाही कमी लेखले नाही, कोणालाही देवत्व देऊन गुलाम केले नाही. त्यांनी माणसाला विचार करायला शिकवले. अंधश्रद्धेने स्वीकारू नका; तपासा, विचार करा आणि मग स्वीकारा, हा त्यांचा संदेश होता. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा हा मूलमंत्र आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

आजच्या समाजात धार्मिक उन्माद वाढताना दिसतो. श्रद्धेपेक्षा प्रदर्शन, अध्यात्मापेक्षा बाजारपेठ आणि धर्मापेक्षा द्वेष अधिक ठळकपणे समोर येतो. अशा वेळी बुद्धांची शिकवण आपल्याला संयम आणि विवेकाची आठवण करून देते. बुद्धांनी धमाला भयाचे साधन बनवले नाही; त्यांनी धर्माला मुक्तीचा मार्ग बनवला. त्यांनी सांगितलेला धर्म म्हणजे करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि अहिंसा. बुद्धांचे करुणेचे तत्त्वज्ञान आजच्या जगासाठी अमृतासमान आहे. युद्धे, दहशतवाद, जातीय हिंसा, कौटुंबिक तणाव, नैराश्य, स्पर्धा आणि असुरक्षितता यांमुळे माणूस आतून तुटत चालला आहे. अशा वेळी दुसऱ्याच्या दुःखाशी एकरूप होणे, संवेदनशील राहणे आणि शांततेचा मार्ग स्वीकारणे, ही बुद्धांची शिकवण जीवनदायी ठरते. मानसिक आरोग्याच्या संदर्भातही बुद्धांचे विचार महत्त्वाचे आहेत. आज जगभर चिंता, नैराश्य, तणाव आणि असमाधान वाढले आहे. पैसा, प्रतिष्ठा आणि यश मिळूनही मन रिकामे वाटते. बुद्धांनी याचे कारण तृष्णा सांगितले. अमर्याद इच्छा, तुलना, लोभ आणि आसक्ती यामुळे मन अस्थिर होते. समाधान, सजगता आणि मध्यम मार्ग स्वीकारल्यास जीवन अधिक शांत होऊ शकते.

आधुनिक मानसशास्त्र आणि ध्यानपद्धतीत बुद्धांच्या विचारांचा प्रभाव स्पष्ट दिसतो. बुद्धांचा मध्यम मार्ग हा आजच्या अतिरेकाच्या काळातील सर्वांत मोठा संदेश आहे. एका बाजूला अति भोगवाद, दुसऱ्या बाजूला अति नकारवाद; एका बाजूला अंधश्रद्धा, दुसऱ्या बाजूला संवेदनाहीनता; एका बाजूला संपत्तीची स्पर्धा, दुसऱ्या बाजूला नैतिक दिवाळखोरी. या टोकांच्या जगात संतुलन राखणे म्हणजेच बुद्धांचा मध्यम मार्ग. भारतातील सामाजिक न्यायाच्या चळवळीवर बुद्धांचा मोठा प्रभाव आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धांच्या विचारांतून समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची आधुनिक मांडणी केली. लाखो वंचितांना मानवी सन्मानाचा मार्ग बुद्धधम्मातून मिळाला. म्हणूनच बुद्ध जयंती ही केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक मुक्तीची आठवणही आहे. पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार आधुनिक आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल दया बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद साधत जगण्याचा मार्ग दाखवला. आज हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण आणि संसाधनांची लूट यामुळे पृथ्वी संकटात आहे. लोभावर नियंत्रण आणि मर्यादित उपभोग ही बुद्धांची शिकवण पर्यावरणरक्षणासाठीही मार्गदर्शक आहे.

आजच्या राजकारणात कटुता, समाजकारणात दिखावा आणि सार्वजनिक जीवनात असहिष्णुता वाढताना दिसते. मतभेद शत्रुत्वात बदलत आहेत. सोशल मीडियावर अपमानाची भाषा सामान्य झाली आहे. अशा वेळी बुद्धांची सम्यक वाणी आठवावी लागते. सत्य बोला, पण कटुतेशिवाय; ठाम बोला, पण द्वेषाशिवाय; मत मांडा, पण मानहानी न करता, ही लोकशाही संस्कृतीची खरी पायाभरणी आहे. बुद्ध जयंती हा केवळ मिरवणुका, रोषणाई किंवा औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसावा. तो आत्मपरीक्षणाचा दिवस असावा. आपण किती संयमी आहोत? आपण दुसऱ्याच्या वेदना समजून घेतो का? आपण जात, धर्म, भाषा, पंथ यांच्या भिंती ओलांडून माणसाला माणूस म्हणून स्वीकारतो का? आपण विवेकाने विचार करतो का? हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. आज गरज आहे बुद्धांना पूजण्यापेक्षा बुद्धांना समजून घेण्याची. त्यांच्या मूर्तीसमोर अगरबत्ती लावणे सोपे आहे; पण मनातील द्वेष विझवणे कठीण आहे. त्यांच्या प्रतिमेला हार घालणे सोपे आहे; पण अहंकार उतरवणे कठीण आहे. जयंती साजरी करणे सोपे आहे; पण करुणा जगणे कठीण आहे. म्हणून बुद्धांचे खरे स्मरण कृतीतून व्हायला हवे. शाळांतून मुलांना स्पर्धेबरोबर संवेदनशीलता शिकवावी लागेल. समाजात न्यायाबरोबर संवाद वाढवावा लागेल. राजकारणात सत्ता नव्हे, तर सेवा महत्त्वाची ठरावी लागेल. कुटुंबात अधिकाराबरोबर स्नेह वाढवावा लागेल. आणि व्यक्तीने स्वतःमध्ये लोभाऐवजी समाधान, रागाऐवजी संयम आणि द्वेषाऐवजी मैत्री वाढवावी लागेल.



भगवान बुद्धांचे जीवन आपल्याला सांगते की, परिवर्तन बाहेरून नव्हे तर आतून सुरू होते. मन बदलले की समाज बदलतो. विचार बदलले की इतिहास बदलतो. करुणा जागी झाली की संघर्ष निवळतो. म्हणूनच बुद्ध आजही जिवंत आहेत ग्रंथांत नव्हे, तर प्रत्येक विवेकी कृतीत; मंदिरांत नव्हे, तर प्रत्येक दयाळू हृदयात. बुद्ध जयंतीनिमित्त आपण हा संकल्प करूया की, मतभेद असले तरी वैर नको, श्रद्धा असली तरी अंधत्व नको, प्रगती असली तरी अहंकार नको, संपत्ती असली तरी संवेदना हरवू नयेत. भगवान बुद्धांच्या २५८९ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! करुणा, प्रज्ञा आणि समतेचा त्यांचा शाश्वत प्रकाश आपल्या समाजाला नवी दिशा देवो, हीच मंगलकामना.

**– प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# तालुक्यात १ मे पासून जनगणना : नागरिकांनी सक्रीय सहभाग नोंदवण्याचे आवाहन

## तालुक्यातील ८५ पर्यवेक्षक व ५५८ प्रगणकांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार पंढरपूर तालुक्यात दि.०१ मे, २०२६ पासून डिजीटल जनगणना मोहिमेला प्रारंभ होणार आहे. या टप्प्यात तालुक्यातील प्रत्येक घराची तसेच कुटुंबातील मूलभूत सुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन स्वयं-गणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे केले आहे

जनगणनेचा पहिला टप्पा ०१ मे, २०२६ ते दि. १५ मे, २०२६ या कालावधीत होणार असून, नागरिकांना स्वयंनोंदणीची सुविधा देण्यात आलेली आहे. नागरिकांनी https://se.census gov. in या संकेतस्थळावर जाऊन ३४ प्रश्नांची माहिती भरावयाची आहे. नोंदणी पूर्ण झालेनंतर मिळणारा युनिक कोड पुढील टप्प्यात प्रगणकाला देणे आवश्यक आहे.

दुसऱ्या टप्प्यात दि. १६ मे २०२६ ते दि. १४ जून, २०२६ या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. स्वयंनोंदणी केले.

ल्या नागरिकांना केवळ युनिक कोड देऊन प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. या जनगणेत नागरिकांची वैयक्तीक माहिती, कुटूंब रचना, घरचा प्रकार, सदस्याची संख्या तसेच घरातील उपलब्ध सुविधा याचा तपशिल गोळा करणेत येणार असून सदरची माहिती केवळ सांख्यिकी हेतूसाठी वापरली जाणार असून गोपनियतेची पूर्ण हमी देण्यात आली आहे. दरम्यान तालुकास्तरावर पर्यवेक्षक व प्रगणक यांचे प्रशिक्षण सुरू आहेत. सदर जनगणनेचे प्रत्यक्ष कामकाज करणेकरीता तालुक्यात ८५ पर्यवेक्षक व ५५८ प्रगणकांची नियुक्ती करणेत आलेली आहे.

जनगणना ही केवळ आकडेवारी नसून शासनाच्या धोरणनिर्मितीची भक्कम पायाभरणी आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने अचूक व प्रामाणिक माहिती देत या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी विजय कुलकर्णी, सल्लागारपदी पत्रकार वडतिले, आराध्ये



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाच्या (फेस्कॉन) अध्यक्षपदी महापालिकेचे सेवानिवृत्त अभियंता व सामाजिक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.व्ही.एन तथा विजय कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. या संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक पंचवीस एप्रिल रोजी पार पडली. त्या सभेत आगामी तीन वर्षासाठी नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. संघाच्या उपाध्यक्षपदी श्रीनिवास करकमकर, कार्याध्यक्षपदी रमेश सोनी, सचिवपदी नागनाथ पाटील, सहसचिवपदी सतीश पाटील, कोषाध्यक्षपदी अशोक गरड तर संघटकपदी श्रीमती निशा गोडबोले यांची निवड करण्यात आली.

तसेच संघाच्या कार्यकारिणीमध्ये सर्वश्री विजयकुमार अथतीकर, पन्नालाल चंडक, अरविंद जगताप, डॉ.राजीव मोहोळकर, विश्वास मोहिते, पांडुरंग अदोने, घनशाम दायमा, ॲड.राजेंद्र दीक्षित व गुरुलिंग कन्नुरकर यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय सल्लागार मंडळात सर्वश्री महादेव माने, श्रीमती कमलाताई शर्मा, विजयकुमार खंडेलवाल, बळवंत अहंकारी, पत्रकार दशरथ वडतिले व सुनील तथा दत्ता आराध्ये यांना संधी देण्यात आली आहे. या निवडीनंतर सर्व पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात सेवानिवृत्ती समारंभ उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयात विविध शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या सेवानिवृत्ती निमित्त कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभात वरिष्ठ विभागातील कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, कनिष्ठ विभागातील प्रा. महादेव जेधे, प्रा. राजेंद्र पाटील, सौ. कमल शिंदे तसेच प्रयोगशाळा परिचर परमेश्वर बनसोडे यांना सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव तथा जनरल बॉडी सदस्य प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव, माजी सहसचिव प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे हेही मान्यवर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते.

प्रमुख पाहुणे डॉ. जाधव यांनी आपल्या मनोगतात ‘हा सोहळा कृतज्ञतेचा असल्याचे सांगून, सेवकांनी दिलेल्या योगदानामुळे संस्थेचा नावलौकिक वाढल्याचे नमूद केले. सेवाकाळात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते, तरीही त्यांनी निष्ठेने काम करत संस्थेची परंपरा जपली, असे त्यांनी सांगितले. रयत संस्कृती ही बंधुभाव, प्रेम, सहिष्णुता व समानता या मूल्यांवर आधारलेली असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

प्राचार्य, डॉ. के. एच. शिंदे यांनी ‘सेवकांच्या त्यागातूनच रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष बहरल्याचे सांगितले. ग्रामीण व दुर्गम भागात कार्य करताना सेवकांनी अनेक अडचणींवर मात करत शिक्षणाची सेवा दिली, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी ‘सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या जाण्याने निर्माण होणारी पोकळी भरून काढणे आव्हानात्मक असल्याचे सांगितले. नवीन पिढीने हा वारसा पुढे नेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमात सेवानिवृत्त शिक्षक व सेवकांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव, संस्थेबद्दलची कृतज्ञता तसेच सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याची आठवण सांगितली. त्यांच्या मनोगतातून भावनिक वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमात अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. चंद्रकांत काळे, प्रा. राजाराम गोडसे, प्रा. वर्षा गारोळे, कार्यालयीन प्रमुख चौरंगनाथ वाघमारे, डॉ. रामदास नाईकनवरे, कु. आकांक्षा जेधे, स्वप्निल व्हटकर आदींनीही मनोगते व्यक्त केली. तसेच सांगली येथील दलित चळवळीचे नेते प्रा. सुकुमार कांबळे, प्राचार्य डॉ. चांगदेव कांबळे, प्राचार्य डॉ. तानाजी लोखंडे, पुणे ग्रामीणचे डी. वाय. एस. पी. मनोजकुमार यादव, पत्रकार जैनुद्दीन मुलानी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक कल्याण समितीचे चेअरमन डॉ. उमेश साळुंखे यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. रोहिणी बावस्कर, प्रा. दिपाली माने व प्रा. योगिता खपके यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन प्रा. महेश कोंडुभैरी यांनी मानले.

समारंभात सेवानिवृत्त सेवकांचा पुष्पगुच्छ, पुष्पहार, शाल, श्रीफळ व चांदीचे नाणे देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित नातेवाईक, मित्रपरिवार व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

**महाराष्ट्राचे कृषीमंत्री मा ना दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आला सन्मान**

# निफाड येथे युवक काँग्रेसचा ट्रॅक्टर मोर्चा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा युवक काँग्रेस व निफाड तालुका युवक काँग्रेसच्या वतीने केंद्र सरकारने प्रस्तावित केलेला भारत अमेरिका व्यापार रद्द व्हावा यासाठी ट्रॅक्टर मोर्चा निफाड कृषी उत्पन्न बाजार समिती येथे तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आला. युवक काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्ष आफरीन शेख जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष गौरव दादा पानगव्हाणे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. हा करार देशातील शेतकरी ग्रामीण अर्थव्यवस्था व अन्न सुरक्षितेसाठी घातक आहे व याचे दुरगामी परिणाम हे अर्थव्यवस्था व कृषी व्यवस्थेवर होणार आहे. देशातील शेतकरी हे अल्पभूधारक असून कर्जाचा बोजाखाली दबलेले आहे. तसेच कुठल्याही पिकाला आधारभूत किंमत अजूनही शेतकऱ्याला मिळत नाही .याउलट हा अमेरिका करार झाला तर शेतकरी आर्थिक अडचणीत येईल ,शेतीमालाचे भाव पडतील कृषिप्रधान संस्कृती संपायला वेळ लागणार नाही. हा करार देशाच्या आत्मनिर्भरतेला धक्का लावणारा असून शेती व शेतकरी संपवणारा आहे.हा करार लवकरात लवकर रद्द व्हावा व शेती व शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी यावेळी आंदोलन कर्त्यांनी केली. स्वतः ट्रॅक्टर घेऊन शेतकरी बांधवांनी या आंदोलनामध्ये सहभाग नोंदवला. या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गौरव पानगव्हाणे काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सचिन होळकर वैकुंठ चोपडे यांनी मनोगत व्यक्त केले यावेळी तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना काँग्रेस पक्षाचे वतीने निवेदन देण्यात आले यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दिगंबर गिते, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विनायक शिंदे, सरचिटणीस सुहास सुरळीकर, जिल्हा उपाध्यक्ष जयदीप कुंदे, नरेंद्र गिते शहराध्यक्ष स्वप्निल बिनायकिया, उपाध्यक्ष अली भाई शेख जेष्ठ नेते प्रभाकर हुजबंद ,अन्वर शेख संपत कराड साहेबराव ढोमसे,जिल्हा सचिव सौरभ पगारे, हर्षल देशमुख उपाध्यक्ष तौसिफ राजे, महेश क्षीरसाठ अंकीत पानगव्हाणे ओझर शहराध्यक्ष क्रष्णा सोनवणे सुरेश गोसावी सतिश भालेराव दुर्योधन गांगुर्डे अभिषेक पानगव्हाणे प्रतिक पानगव्हाणे वैभव कोल्हे गणेश मापारी भगवान पाटील आदी मोठ्या संख्येने शेतकरी बांधव व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झरपडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या वर्गखोलीला भिषण आगीमुळे मोठे नुकसान; सुदैवाने जीवितहानी टळली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : अर्जुनी मोरगाव तालुक्यातील झरपडा येथील जिल्हा परिषद शाळेत गुरुवारी दुपारच्या दरम्यान भिषण आग लागल्याची घटना घडली.

सदर घटना शाळेच्या एका वर्ग खोलीमध्ये शाळेत स्वयंपाक तयार करण्यासाठी सरपन साठवून ठेवणयात आले होते. खुप तापमान असलेल्या पार्श्वभूमीवर अचानकपणे लागलेल्या आगीने काही क्षणातच रौद्र रूप धारण केले.

सदर घटनेच्या वेळी विद्यार्थी शाळेत नसल्यामुळे मोठा अनर्थ टळला.मात्र लागलेल्या आगीत शैक्षणिक साहित्य, फर्निचर, कागदपत्रे तसेच इतर साहित्य, जळून खाक झाले, असुन मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

शाळेमध्ये आग लागल्याची माहिती मिळताच, तात्काळ गावकऱ्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. अग्निशामक दल घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच, ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखून, आपल्या खाजगी मोटार पंपाच्या साहाय्याने, पाण्याचा मारा करुन,लागलेली आग आटोक्यात आणली.गावकऱ्यांच्या तत्परतेमुळे आग दुसऱ्या वर्ग खोलीपर्यंत पसरण्यापर्यंत गावकऱ्यांना यश आले.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून,शाळेच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या परीसरात तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास ,पोहोचल्यामुळे उष्णतेमुळे,अशा आगीच्या घटना घडण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे शाळा परिसरात ज्वलनशील साहित्य साठवून न ठेवणे विद्युत यंत्रणांची, नियमित तपासणी करणे, तसेच अग्निसुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे राबविणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर गजानन डोंगरवार यांनी नुकसानग्रस्त वर्ग खोलीच्या ठिकाणी, तात्काळ नवीन वर्ग खोली मंजूर करून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये,,असी मागणी प्रशासनाकडे केलीआहे. तसेच संबंधित घटनेची सखोल चौकशी करून, आग लागण्याचे नेमके कारण शोधण्याचेही मागणी करण्यात आलेली आहे .सदर घटनेनंतर शिक्षण विभाग, व स्थानिक प्रशासने, शाळांना सतर्कतेचा इशारा देत ,आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# पंढरपुरात चंद्रभागेच्या पात्रात तरुण भाविक बुडून बेपत्ता: शोध कार्य सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नदीपात्रात पाणी सोडल्याने विठ्ठल दर्शनासाठी आंध्रप्रदेश येथील तरुण चंद्रभागा निधीमध्ये स्नानासाठी गेला होता. वाळू उपशामुळे नदीपत्रांमध्ये मोठमोठे खड्डे पडलेले असल्याने त्याला पाण्यामध्ये गेल्यानंतर खड्ड्याचा अंदाज आला नसल्यामुळे तू बुडाला आहे त्याची शोध कार्य करण्यात चालू आह अवैद्य वाळू उपशामुळे तरुणाचा बळी घेतल्यामुळे भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त आहे

वाळूची टंचाई भासत असल्यामुळे चंद्रभागा नदीपात्रातून वाळू उपसा मोठ्या प्रमाणात केला जातो गेल्या काही महिन्यापासून चंद्रभागा नदीपात्रात पाणी नसल्यामुळे नदीपात्रातून अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणात केला जात आहे. मोठे खड्डे पडले आहेत सध्या उजनी धरणातून पाणी नदीपात्रात सोडण्यात आले आहे. नदी दुथडी भरून वाहत आहे. आंध्र प्रदेशातील तरुण माधव कटम हा गुरुवारी सकाळी चंद्रभागा नदीमध्ये स्नान करण्यासाठी नातेवाईकांसह गेला होता त्याला खड्ड्याचा अंदाज न आल्यामुळे तो नदीपात्रात बुडाला त्याचा शोध घेतला जात आहे नदीपात्रातील खड्ड्यामुळे तरुणाचा बळी गेला असा भावी कामातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

चंद्रभागा नदीमध्ये पाणी आल्यानंतर भावीक बुडूने यासाठी आपत्ती व्यवस्थापन टीम नगरपरिषद व पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने कार्यालय ठेवणे गरजेचे आहे. या शासनाने परवानगी दिली आहे. मात्र मंदिर समितीचा गलथान कारभार असल्यामुळे टीम न ठेवल्यामुळे भाविकांचा बळी गेला आहे. असा आरोप महर्षी वाल्मिक संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पुस्तकांचा संग्रह करणारे संभाजी बारणे यांची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : साहित्य व सांस्कृतिक क्षेत्राबरोबर विविध क्षेत्रात मुशाफिरी करणारे थेरगावची ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संभाजी बाळासाहेब बारणे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर विविध लेखकांनी लिहिलेले विविध नऊ भाषेतील ५५१ पुस्तकांचा संग्रह जमा केला आहे त्यामध्ये मराठी ,हिंदी ,इंग्रज, संस्कृत कन्नड तामिळ तेलुगु गुजराती आणि सिंधी भाषेतील पुस्तकांच्या समावेश आहे संभाजी बारणे यांच्या या पुस्तकात संग्रहाची इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये येतोचित नोंद करण्यात आले आहे तसे प्रमाणपत्र स्मृतीचिन्ह नुकतेच बारणे यांना इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या समितीच्या वतीने २५ मार्च २०२६ रोजी प्रदान करण्यात आले आहे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अशा प्रकारचा पुस्तक संग्रह करणारे संभाजी बारणे हे एकमेव आहेत असा दावा त्यांनी केला आहे त्यांच्या विक्रमाची नोंद राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आल्यामुळे सर्व शिवप्रेमी मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे संभाजी बारणे हे एकमेव आहेत असा दावा त्यांनी केला आहे त्यांच्या विक्रमाची नोंद राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आल्यामुळे सर्व शिवप्रेमी मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे संभाजी बारणे हे पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव येथील उच्चशिक्षित रहिवाशी असून शेती व बांधकाम व्यवसाय करतात त्यांच्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती नाणी नागरिकांना पाहण्यासाठी त्यांच्या थेरगाव येथील कार्यालयात रोज सकाळी दहा ते संध्याकाळी सहा या वेळेत उपलब्ध आहेत थेरगाव गावठाण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्ध पुतळा लोकवर्गणीतून उभारण्यासाठी बारणे यांनी पुढाकार घेतला होता.

शिक्षण, कला, क्रीडा, सांस्कृतिक आरोग्य पर्यावरण राजकारण साहित्य अशा विविध क्षेत्रातील सक्रिय असणारे बारणे यांनी यापूर्वी पिंपरी चिंचवड शहरातील १९७८ सालापासून २०२२ पर्यंतच्या आजी-माजी नगरसेवकांच्या बाराशे विजिटिंग कार्डांचा संग्रह केला आहे त्यांची नोंद देखील इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये २०१९ मध्ये घेण्यात आले आहे महानगरपालिकेत वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्य म्हणून काम केले आहे तसेच अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे राजीव सभासद आहेत त्यांनी संपादन केलेले पिंपरी चिंचवड येथील वैभव या कवितासंग्रहाचे जेष्ठ सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते नुकतेच प्रकाशन करण्यात आले.

# राज्यात सात जिल्ह्यांत एमआरआय सेवेचे लोकार्पण; ११ जिल्ह्यांत मोफत डायलिसीस सेवेचा विस्तार

## महाराष्ट्र दिनी आरोग्यमंत्री करणार दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्‌घाटन; ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्यातील आरोग्य सेवेला बळकटी देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेत, सात जिल्ह्यांमध्ये एमआरआय सेवा सुरू करण्यात येत असून ११ जिल्ह्यांमध्ये डायलिसीस सेवांचा विस्तार करण्यात येत आहे. या सर्व सेवांचे लोकार्पण सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात येणार असून, यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा घराजवळ उपलब्ध होणार आहेत.

प्रधानमंत्री राष्ट्रीय डायलिसीस कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील विविध आरोग्य संस्थांमध्ये डायलिसीस सेवा पुरविण्यात येत आहे. याच अनुषंगाने कोल्हापूर, यवतमाळ, बीड, नाशिक, जळगाव, सोलापूर, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, गडचिरोली आणि रत्नागिरी या ११ जिल्ह्यांतील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये डायलिसीस सेवा सुरू करण्यात येत आहे. या सेवेमुळे किडनी विकारग्रस्त रुग्णांना नियमित व मोफत उपचार मिळणार असून, प्रवासाचा त्रासही कमी होणार आहे.

राज्यातील ९२ आरोग्य संस्थांमध्ये सार्वजनिक–खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर डायलिसीस सेवा यापूर्वीच कार्यान्वित करण्यात आली आहे. ही सेवा सर्व रुग्णांसाठी पूर्णपणे नि:शुल्क असून, गुणवत्तापूर्ण उपचार ग्रामीण भागातच उपलब्ध करून देण्याचा सरकारचा उद्देश आहे.

यासोबतच भंडारा, बुलढाणा, अमरावती, नांदेड, धाराशिव, हिंगोली आणि परभणी या सात जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांमध्ये एमआरआय सेवा सुरू करण्यात येत आहे. या सेवा २४७ उपलब्ध राहणार असून सर्व शासकीय रुग्णांसाठी पूर्णपणे मोफत असतील. या प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ, जसे की टेक्निशियन व रेडिओलॉजिस्ट, हे सेवापुरवठादारा मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

एमआरआय ही आधुनिक वैद्यकीय तपासणी पद्धत असून, शरीरातील अंतर्गत अवयवांचे सविस्तर व उच्च गुणवत्तेचे चित्र मिळवण्यासाठी ती उपयुक्त ठरते. यामुळे अचूक निदान, रोगाचे स्वरूप समजणे, उपचाराचे योग्य नियोजन करणे आणि उपचारांना मिळणारा प्रतिसाद तपासणे शक्य होते.

**लोकार्पण करण्यात येणारी डायलिसीस केंद्रे**

कोल्हापूर (मुरगुड), यवतमाळ (दारव्हा), बीड (केज), नाशिक (इगतपुरी), जळगाव (रावेर), सोलापूर (मंगळवेढा), सातारा (ढेबेवाडी), सिंधुदुर्ग (वेंगुर्ला), ठाणे (बदलापूर), गडचिरोली (कुरखेडा), रत्नागिरी (दापोली).

**लोकार्पण करण्यात येणारी एमआरआय केंद्रे**

भंडारा, बुलढाणा, अमरावती (संदर्भ सेवा रुग्णालय), नांदेड, धाराशिव, हिंगोली, परभणी.

या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.

## वडार मजूर शिल्प प्रतिष्ठानचा पुरस्कार ज्योती चौगुले यांना जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र वडार मजूर शिल्प प्रतिष्ठानचा समाज गौरव पुरस्कार सोलापुरातील सामाजिक कार्यकर्त्या सौ.ज्योती नागेश चौगुले यांना जाहीर झाला आहे.



सौ.ज्योती चौगुले ह्या मी वडार महाराष्ट्राचा या संघटनेच्या सोलापूर शाखेच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा आहेत,त्या अमर मराठी विद्यालयाच्यागोकुळ बालक मंदिरामध्ये अंगणवाडी शिक्षिका आहेत.

हा पुरस्कार वितरण सोहळा बर्ड व्हॅली गार्डन, संभाजीनगर, चिंचवड- पुणे येथे होणार आहे, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व बुके असे पुरस्काराचे स्वरूप आहे.महापौर व आयुक्त आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण दिनांक एक मे रोजी महाराष्ट्रदिनी होईल.

या पुरस्काराबद्दल सौ.ज्योती चौगुले यांचे अनेक शिक्षक व वडार समाज बांधवांनी अभिनंदन करून त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून नवीन प्रेरणा मिळाल्याचे सांगितले आहे.

## शून्यातून विश्व निर्माण! संस्कृती रमेश शिंदेची आयसीएससी बोर्डात कौतुकास्पद यश संपादित, भूमापक रमेश शिंदेंच्या कन्येची भरारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : जिथे जिद्द असते, तिथे यशाचा मार्ग हा आपोआप सापडतो, हे कु. संस्कृती रमेश शिंदे हिने आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीवर मात करत, संस्कृतीने खउडए बोर्डाच्या परीक्षेत ९२.१६% गुण घेऊन उत्तुंग यशाला गवसणी घातली आहे.

जिथे जिद्द असते, तिथे यशाचा मार्ग हा आपोआप सापडतो, हे कु. संस्कृती रमेश शिंदे हिने आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीवर मात करत, संस्कृतीने खउडए बोर्डाच्या परीक्षेत जे उत्तुंग यश संपादन केले आहे, ते केवळ तिचे यश नसून एका मध्यमवर्गीय कुटुंबाच्या संघर्षाचा विजय आहे.

**वडिलांचे कर्तव्य आणि आईचा त्याग** : संस्कृतीचे वडील श्री. रमेश शिंदे हे 'भूमी अभिलेख' (Land Records) विभागात सिंदखेड राजा ' भूमापक ' (Surveyor) या पदावर कार्यरत आहेत. आपल्या नोकरीच्या स्वरूपामुळे त्यांना अनेकदा घरपासून दूर, परगावी राहावे लागते. वडिलांच्या अनुपस्थितीत घरची जबाबदारी आणि संस्कृतीच्या शिक्षणाची पूर्ण धुरा तिच्या आईने समर्थपणे सांभाळली. आपल्या मुलीने शिकावे, मोठे व्हावे आणि जीवनात यशस्वी व्हावे, यासाठी तिच्या आईने घेतलेले कष्ट आज संस्कृतीच्या निकालातून फळाला आले आहेत.

**उच्चशिक्षित पार्श्वभूमी नसतानाही ऐतिहासिक यश** : शिंदे परिवारामध्ये खउडए सारख्या कठीण बोर्डाच्या परीक्षेत इतके मोठे यश मिळवणारी संस्कृती ही पहिलीच विद्यार्थिनी ठरली आहे. घरात शिक्षणाचा कोणताही मोठा वारसा किंवा पार्श्वभूमी नसताना, केवळ स्वतःच्या मेहनतीने तिने हा डोंगर सर केला आहे. वडिलांच्या कष्टाची जाणीव आणि आईने दिलेली अभ्यासाची शिस्त, यातूनच संस्कृतीची शिक्षणाविषयीची जिद्द आणि चिकाटी दिसून येते.

**शिंदे परिवाराची 'पहिली' सुशिक्षित झेप** : संस्कृतीच्या या यशामुळे शिंदे परिवाराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. कुटुंबातील इतक्या मोठ्या स्तरावरील परीक्षेत यश मिळवणारी ती पहिलीच कन्या ठरली आहे.या अगोदर संस्कृतीने लातूर येथील प्रसिद्ध शाहू कॉलेज ची स्क्रिनिंग टेस्ट आणि संत तुकाराम कॉलेज ची स्क्रिनिंग टेस्ट विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झाली आहे. मुलीने मिळवलेल्या या यशाने पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले आहेत. मुलांच्या यशापेक्षा आणि त्यांच्या सुखापेक्षा पालकांसाठी दुसरी कोणतीही मोठी संपत्ती नसते, असे भावूक उद्गार तिचे वडील श्री. रमेश शिंदे यांनी काढले.

**यशाचे गमक : आई-वडिलांच्या स्वप्नांची पूर्ती** : मुलांच्या यशापेक्षा पालकांसाठी दुसरे मोठे सुख नसते. संस्कृतीच्या यशाने तिच्या आई-वडिलांच्या कष्टाचे चीज झाले आहे. भूमी अभिलेख विभागात जमिनी मोजण्याचे काम करणाऱ्या वडिलांसाठी, आज त्यांच्या मुलीने यशाचे आकाश मोजले आहे, हा क्षण अभिमानास्पद ठरला आहे.

माझे वडील नोकरीनिमित्त बाहेर गावी असताना आईने माझी सावली बनून मला साथ दिली. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवूनच मी हे यश मिळवू शकले, असे भावूक मत संस्कृतीने व्यक्त केले.

**प्रेरणादायी संदेश :** संस्कृतीचे हे यश समाजातील अशा प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे, ज्यांच्याकडे सोयीसुविधांची कम तरता आहे. जर कष्ट करण्याची



तयारी असेल, तर परिस्थिती कधीही आडवी येत नाही, हेच संस्कृतीने सिद्ध केले आहे. तिच्या या ऐतिहासिक यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत असून पुढील वाटचालीस भरघोस शुभेच्छा दिल्या जात आहेत.जे उत्तुंग यश संपादन केले आहे, ते केवळ तिचे यश नसून एका मध्यमवर्गीय कुटुंबाच्या संघर्षाचा विजय आहे.



## मंगरूळ ग्रामपंचायतीवर पाणी प्रश्नावर हंडा मोर्चा; ५ मे रोजी आमरण उपोषणाचा इशारा, ग्रामस्थ आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

चिखली तालुक्यातील मौजे मंगरूळ येथे दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी गावातील तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर संतप्त ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा काढून जोरदार आंदोलन केले व संबंधित कर्मचारी यांना धारेवर धरले महिलांसह नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

पाणी आमचा हक्कच आहे , गावाला पाणी मिळालेच पाहिजेनियोजन शुन्य करभार मुळे आमच्यावर पाण्यासाठी वन वन भटकण्याची वेळ आली आहे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

गेल्या अनेक दिवसांपासून नियोजन शुन्य करभार मुळे गावात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून, नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधूनही प्रश्न सुटला नसल्यामुळे अखेर ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग अवलंबला.

या वेळी ग्रामस्थांच्या वतीने गटविकास अधिकारी (इऊज) समाधान वाघ साहेब यांना निवेदन देण्यात आले. तसेच, पाणी प्रश्न तात्काळ न सोडवल्यास दिनांक ५ मे २०२६ रोजी आमरण उपोषण करण्यात येईल, असा ठाम इशारा देण्यात आला.

ग्रामस्थांनी प्रशासनाने त्वरित पाणीपुरवठ्याची योग्य व्यवस्था करावी, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा निर्धार आज व्यक्त केला आहे.

## कल्याणमध्ये 'समता विचार पर्व २०२६' उत्साहात; समविचारी संघटनांच्या एकतेवर भर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : कल्याण येथील परिसरात समता संघर्ष संघटना, समता संघर्ष सांस्कृतिक मंच आणि कवी नारायण सुर्वे जन्म शताब्दी समारोह समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'समता विचार पर्व २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमाने सामाजिक समता, प्रबोधन आणि वैचारिक एकतेचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या प्रबोधन सत्रात मुंबई विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. सुमेध पारधे आणि सावित्रीबाई फुले रिसोर्स सेंटरच्या सेक्रेटरी व रिसर्च स्कॉलर दिपाली साळवे यांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. सुमेध पारधे म्हणाले, वर्तमानातील सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी समविचारी संघटनांनी आपापसात 'कॉमन मिनिमम प्रोग्राम' तयार करून वैचारिक एकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

त्यांनी सामाजिक चळवळींमध्ये समन्वय आणि एकजूट यांचे महत्त्व अधोरेखित केले. तर दिपाली साळवे यांनी युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले, विहार हे युवकांसाठी एक सक्षम रिसोर्स म्हणून उभे राहिले पाहिजे. तसेच तरुणांनी जास्तीत जास्त उच्च शिक्षणाचे ध्येय उराशी बाळगले पाहिजे. त्यांच्या या वक्तव्यामुळे युवकांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. या प्रबोधन सत्राचे अध्यक्षस्थान शैलेश दोंदे यांनी भूषवले. यावेळी सातारा येथे होणाऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष म्हणून लोकशाहीर संभाजी भगत यांचा जाहीर नागरी सत्कार ज्येष्ठ आंबेडकरी कवी शिवा इंगोले यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉम. उदय चौधरी होते. कार्यक्रमात समाजातील सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या विविध मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यामध्ये महेंद्र उबाळे, सदानंद गायकवाड, कवयित्री सुरेखा पैठणे, शाहीर आकाश पवार, चित्रपट निर्मिति महेश बनसोडे, रंगकर्मी प्रा. प्रदीप सरवदे आणि डॉ. प्रमिला संपत यांचा समावेश होता.

कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, ठाणे व मुंबई येथील अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शैलेश दोंदे, कॉम. उदय चौधरी, अविनाश दोंदे, संजय इदे सर, गणेश सोष्टे, श्रीकांत कांबळे, सदानंद गायकवाड, सुरेखा पैठणे, रंजना आठवले आणि प्रा. सोनाली अहिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

'समता विचार पर्व २०२६' या उपक्रमातून सामाजिक समता, बंधुता आणि वैचारिक एकतेचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचला.

### लोकशाही पत्रकार संघाचा पत्रकार प्रशिक्षण मेळावा संपन्न

# पत्रकारांना योग्य न्याय मिळावा यासाठी पत्रकारांची वज्रमुठ बांधणार : किशोर पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :



युवा पत्रकारांचे नेतृत्व करिअर आणि करिअरची संधी नव्या पिढीचे भूमिका या विषयाला अनुसरून कौशल्य विकास डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर आणि मजबूत नेटवर्किंग या विषयाला अनुसरून पत्रकार आणि आधुनिक युवा पत्रकार जुळवून घेत प्रगती साधावी आणि पत्रकारांनी पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी वज्रमुठ बांधण्यासाठी आम्ही सक्षम आहोत शिवाय लोकशाही पत्रकार संघटनेची उद्दिष्टे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे युवा अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर दादा पवार यांनी व्यक्त केले.

लोकशाही पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणाले संघटनेची एकजुट पत्रकारांचे हक्क आणि जबाबदाऱ्या यावर प्रकाश टाकत संघटनात्मक बांधणी आणि बळकटीचे महत्व विषद करत उपस्थित पत्रकारांना प्रेरणा दिली.

यावेळी संदीप जाधव राष्ट्रीय उपाध्यक्ष, प्रतापराव साळुंके, विधी पळसापूरे माध्यम सल्लागार, संतोष कुमार जयस्वाल सेवानिवृत्त न्यायाधिश, पंचशिला कांबळे अध्यक्ष मराठवाड प्रदेश, मराठवाडा अध्यक्ष बालाजी सुर्यवंशी, रेणूका जयस्वाल विदर्भ महिला अध्यक्षा, प्रतिक जयस्वाल मराठवाडा युवा अध्यक्ष, धाराशिव युवा जिल्हाध्यक्ष राहुलजी थोरात, लातूर महिला जिल्हाध्यक्षा राहु पाटील, महिला उपाध्यक्षा कविता घोडके, पुणे जिल्हा उपाध्यक्ष नकुल सोनवणे, पुणे युवा उपाध्यक्ष निखिल घोडके, उमरगा युवा महिला अध्यक्षा रेणुका कटके आदिजन उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आरती राठोड यांनी केले तर आभार ही मानण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील अनेक पत्रकार या मेळाव्यास उपस्थित होते.